सोलापूर
प्रखर राष्ट्रीय विचारांचे दैनिक
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
संभाजीनगर, सातारा, सोलापूर, अहमदनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून प्रकाशित
epaper.dainiktarunbharat.com
30 Jan 2024 - Page 9

# नाट्य संमेलनामुळे सोलापूरच्या नाट्य चळवळीला चालना

## दमदार पालकमंत्र्यांच्या परफेक्ट नियोजनामुळे संमेलन यशस्वी; सोलापूरला मिळणार नवीन २ सभागृह

**तभा वृत्तसेवा, प्रशांत माने**
**सोलापूर, दि. २९ जानेवारी-**

शंभराव्या अखिल भारतीय नाट्य संमेलनामुळे अनेक वर्षानंतर सोलापूरकरांना साहित्य, कला, संस्कृती कार्यक्रमांची मेजवानी तर मिळालीच पण सोलापूरच्या नाट्य चळवळीलाही मोठी चालना मिळाली.

दोन ते तीन दिवस प्रमुख कार्यक्रम आणि गेल्या आठ दिवसांपासून सुरु असलेल्या विविध कार्यक्रमांमुळे शहरातून निघालेल्या दिमाखदार नाट्य दिंडीमुळे सोलापूरचे वातावरणच कला-साहित्य-संस्कृतीमय झाल्याचे चित्र होते. सोलापूरकरांना हा आनंद देण्यात मोठी भूमिका बजावली ती सोलापूरचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी होय. दमदार पालकमंत्र्यांच्या दिमाखदार यशस्वी नियोजनामुळे सोलापूरच्या नाट्य चळवळीला गती तर मिळालीच पण दोन नवीन नाट्य सभागृह देखील घोषित होवून पालकमंत्री पाटील यांनी १० कोटींच्या निधीचीही घोषणा तात्काळ केली. दरवर्षी न चुकता होणाऱ्या प्रिसिजन संगीत महोत्सव आणि प्रिसिजन गप्पांच्या माध्यमातून सोलापूरची संस्कृतिक चळवळ काहीशी जिवंत राहिलेली आहे.

हुतात्मा स्मृती मंदिरच्या दुरवस्थेमुळे आणि विमानसेवा नसल्यामुळे मोठी नाटके, सिनेकलावंतांचे कार्यक्रम, दिग्गज संगीतकारांच्या संगीत रजनी असे मनोरंजनाचे कार्यक्रम आयोजित होत नसल्याची शोकांतिका आहे. एकेकाळी सोलापुरात सातरस्ता परिसरात दमाणी सभागृह होते, ते देखील कालांतराने बंद पडले. महापालिकेकडून हुतात्मा स्मृती मंदिर सभागृहाचे भाडे आकारले जाते पण ते अद्ययावत ठेवले जात नसल्याची ओरड नेहमीच असते. हुतात्मा सुसज्ज राहण्यासाठी संवेदनशील आणि कलाप्रेमी आयुक्त असणे देखील गरजेचे म्हणावे लागेल. सोलापुरात म्हणावी तशी मनोरंजनाची पुरेशी साधने नसल्यामुळे सोलापूरकरांची नेहमीच नाराजी असते तर शहरातील मोठे एकमेव हुतात्मा स्मृती मंदिर सभागृहाच्या दुरवस्थेचा विषय नेहमीच चर्चेत असतो.



मागे खूप वर्षापूर्वी बार्शीत साहित्य संमेलन झाले होते. सोलापुरात ह. दे. प्रशालेल्या मैदानावर झालेले अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन आणि पार्क मैदानावर झालेले नाट्य संमेलन गाजले होते. मध्यंतरी जिल्हा प्रशासनाच्या पुढाकाराने सोलापुरात सलग तीन वर्षे सोलापूर महोत्सव भरला जात होता. काही वर्षापूर्वी गझलकार गुलाम अली यांच्या उपस्थितीत उर्दू साहित्य संमेलन भरले होते. भीमराव पांचाळ यांचाही कार्यक्रम झाला होता. परंतु गेल्या काही वर्षापासून सोलापुरात कला, साहित्य आणि संस्कृतीचे मोठे कार्यक्रम झालेले नाहीत. महापालिकेचे प्राणीसंग्रहालय बंद आहे. ॲडव्हेंचर पार्क बंद आहे. छत्रपती संभाजी तलावातील कारंजे देखील बंद-चालू अवस्थेत असते. आता बोटींगमुळे काहीसा दिलासा मिळाला आहे. सोलापूरची शान असलेल्या चार हुतात्मा पुतळा परिसर सुशोभित करण्यात आला, परंतु या परिसराला नेहमीच फेरीवाल्यांचा विळखा असतो. तर समोरील फुटपाथवर भेळ-पाणीपुरवाल्यांचे अतिक्रमण असल्याने नागरिकांना खंदक कट्ट्यावर बसण्याचा आनंद लुटता येत नाही, जो की पूर्वी तो आनंद मिळत होता. एच.एन. लायब्ररीच्या समोर मोठी कचराकुंडी असून ती नेहमीच कचऱ्याने भरलेली असते आणि विशेष म्हणले पालिका प्रशासन त्यावर कायमचा तोडगा काढत नाही. अनेक समस्या असल्या तरी बापडे सोलापूरकर नेहमीच आनंदी दिसतात कारण त्यांच्या समस्या सुटतच नसल्याने नाईलाज असल्याचे ते सांगतात.

सोलापूरच्या पालकमंत्री पदाचा पदभार नुकताच मंत्री चंद्रकांत पाटील यांनी हाती घेतला आणि त्यांनी सुरुवातीलाच सोलापूरच्या कला, साहित्य, संस्कृतीला चालना देण्याचे कौतुकास्पद काम केले आहे. नाट्य संमेलनासाठी मोठा निधी उभारणे, मोठे कलावंत आणणे, लोकप्रिय मराठी कार्यक्रम, नाट्य दिंडी, गाजलेल्या नाटकांचे प्रयोग, दिग्गज मराठी सिनेअभिनेत्यांच्या प्रकट मुलाखती अश्या निखळ मनोरंजनाची मेजवाणी सोलापूरकरांना मिळाली. याचे संपूर्ण श्रेय जाते ते पालकमंत्री चंद्रकांत पाटील आणि संयोजनातील सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते यांना होय. असेच कार्यक्रम भविष्यात व्हावेत, हीच सोलापूरकरांची अपेक्षा.

### दरवर्षी सोलापूर महोत्सव भरविला जावा

सोलापुरात पंधरा वर्षांपूर्वी तत्कालीन पालकमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील यांच्या नेतृत्वाखाली जिल्हा प्रशासनाच्या वतीने तीन दिवसांचा सोलापूर महोत्सव भरविला गेला होता. हा सोलापूर महोत्सव सलग चार वर्षे यशस्वीपणे पार पडला आणि सोलापूरकरांचे मोठे मनोरंजन देखील झाले होते. अनेक वर्षांपूर्वी महापालिकेकडून देखील असे महोत्सव भरविले जात होते. तर त्याही पूर्वी एकेकाळी बार्शीच्या नर्गिस दत्त कॅन्सर हॉस्पिटल उभारणीसाठी ह. दे. प्रशालेच्या मैदानाव दिग्गज सिने अभिनेत्यांच्या उपस्थितीत मोठा कार्यक्रम झाला होता. सोलापूरची सांस्कृतिक चळवळ जिवंत ठेवायची असल्यास पालकमंत्री, जिल्हा प्रशासन, महापालिका, लोकप्रतिनिधी यांच्या माध्यमातून दरवर्षी सोलापूर महोत्सवाचे आयोजन होण्याची खूप गरज आहे.